# बृहन्मुंबई महानगरपालिका

## ई-दरपत्रिका

क्रमांक : सआकेपू/१७८४/सअ(परि.)/जन. दिनांक : २२/०८/२०२२

सहाय्यक आयुक्त, के/पूर्व विभाग यांचे कार्यालय,
के/पूर्व विभाग कार्यालयीन इमारत,
खोली क्र. १०१ पहिला माळा, आझाद रोड,
गुंदवली, अंधेरी (पूर्व) मुबंई-४०००६९.
दु. क्र. २६८३७१०४ विस्तारित क्रं. ३२८

के/पूर्व विभागातील सहाय्यक आयुक्त, के/पूर्व विभाग यांच्या मंजूरीनुसार खाली दर्शविलेल्या कामासाठी बृहन्मुंबई महानगरपालिका मान्यता प्राप्त संस्था / कंत्राट्दारांकडून तातडीच्या कामासाठी, तात्काळ निविदा / दरपत्रिका मागविण्यात येत आहेत. मान्यताप्राप्त इच्छुक संस्था / कंत्राट्दारांनी दिनांक २३/०८/२०२२ ते २५/०८/२०२२ रोजी सकाळी १०.०० ते दुपारी ०१.०० वाजेपर्यंत मुख्य लिपिक (व्यय) के/पूर्व विभाग यांच्याकडून रु.२२०/- अधिक वस्तू व सेवा कर (GST) इतकी रक्कम भरून निविदा / दरपत्रिका फार्म खरेदी करण्यात यावा.

इसारा अनामत रक्कम (EMD) रु.६०००/- DD/CASH द्वारे भरून त्याची पावती निविदा / दरपत्रिकेच्या लिफाप्या सोबत जोडण्यात यावी व मुख्य लिपिक (व्यय) के/पूर्व विभागातील निविदा / दरपत्रिका पेटीमध्ये मोहरबंद निविदा / दरपत्रिका लिफाफा टाकण्यात यावा व तो लिफाफा दिनांक २५/०८/२०२२ त्याच दिवशी दुपारी ०३.०० वाजता किंवा त्यानंतर उघडण्यात येईल.

तसेच मोहरबंद निविदा / दरपत्रिका स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार मा. सहाय्यक आयुक्त, के/पूर्व विभाग यांनी राखुन ठेवला आहे. अट असलेली स्थळ निविदा / दरपत्रिका स्विकारली जाणार नाही.

| अ. क्र. | कामाचे वर्णन | अंदाजित किंमत |
|---|---|---|
| १ | के/पुर्व विभागात कोरोना विषाणूचा प्रादुर्भाव / संसर्ग रोखण्यासाठी व प्रतिबंधात्मक उपाययोजना म्हणून नागरिकांच्या लसीकरणासाठी विविध ठिकाणी उभारण्यात आलेल्या Covid-19 च्या लसीकरण केंद्रात साफसफाई व इतर आवश्यक कामांकरिता मनुष्यबळ पुरविणेबाबत.<br>कार्यादेश जारी केल्याच्या दिनांकापासून तीन महिन्याचा कालावधीकरिता (एकूण ९० दिवस). | रु.२९९९९७/-<br>(वस्तू व सेवा कर सहित) |

सदर स्थळ निविदेमध्ये काही बदल झाल्यास सहाय्यक आयुक्त, के/पूर्व विभागातील सुचना फलकावर लावण्यात येईल.

सही/-
सहाय्यक अभियंता (परिरक्षण-३) के/पूर्व विभाग